# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महावितरण

कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, बांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६५७४२११

जा.क्र. : काओसंवि /ब/क्रीडा/गणवेश/४७६१

दिनांक : ११/०२/२००९

## परिपत्रक

विषय : राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना पुरविल्या जाणाऱ्या गणवेश अनुदानात वाढ करण्याबाबत.

संदर्भ : प्रशासकीय परिपत्रक क्र. १४१ दि. ११/०४/१९९४.

**********

प्रशासकीय परिपत्रक क्र. १४१ दि. ११/०४/१९९४ नुसार राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धेत सहभागी होणारा संघ शिस्तबध्द व एकरुप दिसावा यादृष्टीने सदरहू स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना दोन वर्षातून एकदा गणवेश पुरविण्यात येतो. उपरोक्त गणवेश पुरविण्यासाठी प्रती परिमंडळ रु. ४६,०००/- (रु. सेहेचाळीस हजार मात्र) रकमेची तरतूद करण्यात आली आहे. परंतु सद्यस्थितीत खेळाच्या गणवेशाच्या किंमतीत बरीच वाढ झाल्यामुळे सदरहू अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. मा. व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी संचालक (वित्त) यांचेशी विचारविनिमय करुन गणवेश पुरविण्यासाठी प्रती परिमंडळ रु. ४६,०००/- ऐवजी रु. ६५५००/- (रु.पासष्ट हजार पाचशे मात्र) इतक्या रकमेचे अनुदान मंजूर केले आहे.

३. उपरोक्त अनुदान वित्तीय वर्ष २००८-०९ पासून लागू राहील.

४. प्रशासकीय परिपत्रक क्र. १४१ दि. ११/०४/१९९४ मधील अटी व शर्ती अबाधित राहतील.

किशोर पवार.
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत

प्रत रवाना :
उप कामगार अधिकारी (क्रीडा), औरंगाबाद / वर्धा.

E:\Backup Of Meena\D Drive\kam B on\natya kreeda\ganvesh.doc